महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ३० जून २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ००९ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# कल्याण बाजार समितीवर महायुतीची सत्ता

## १५ जागांवर महायुती विजयी ■ २ महाविकास आघाडी ■ १ अपक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत बाजार समितीवर महायुतीचा झेंडा फडकला असून एकूण 18 जागापैकी 15 जागा महायुतीच्या कोट्यात पडल्या असून 2 जागांवर महाविकास आघाडी तर एक जागा अपक्ष उमेदवाराला मिळाली असल्यामुळे कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीवर मतदात्यांनी महायुतीला एक हाती सत्ता देऊन आपला विश्वास दाखविला.



कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीचा निकाल रविवारी रात्री उशिरा जाहीर झाला. निवडणुकीत पार पडलेल्या मतदान प्रक्रियेला मतदारांनी भरभरून प्रतिसाद दिला. रविवारी सकाळी सात वाजता मतदानासाठी मोठी गर्दी केली होती. तर सायंकाळी पाच पर्यंत मतदानाचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला. एकूण मतदानाच्या 90.37% मतदानाची नोंद करण्यात आली. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीत 2358 मतदारांपैकी तब्बल 2131 मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला, यामध्ये महिलांचा सहभागही लक्षणीय होता. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या 18 जागांपैकी एकूण 17 जागांसाठी हे मतदान झाले असून एक उमेदवार बिनविरोध निवडून आला. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत 155 उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यापैकी 15 अर्ज बाद असून प्रत्यक्षात निवडणुकीच्या रिंगणात 51 उमेदवारांनी आपले नशीब आजमावले होते.

### विजयी उमेदवार

**या निवडणुकीत विजयी उमेदवार रवींद्र घोडविंदे, कपिल थळे, भरत गोंधळे, योगेश धुमाळ, अरुण पाटील, जालिंदर पाटील, मनोहर पाटील, विद्या पाटील, शारदा पाटील, वसंत लोणे, रवींद्र आव्हाड, नरेश सुरोशी, रवींद्र भोईर, किशोर वाडेकर, विजय सुरोशी, काशिनाथ नरवडे आणि गिरीश पाटील हे उमेदवार प्रत्यक्षात निवडणूक लढवून जिंकले असून हमाल व तोलाई गटातील शंकर आव्हाड हे बिनविरोध निवडून आले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी विशाल जाधवर यांनी दिली.**

# आज पासून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

यंदाच्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा कार्यक्रम आणि वेळापत्रक निश्चित झाले आहेत. त्यानुसार 30 जून ते 18 जुलै या काळात पावसाळी अधिवेशन होणार आहे. यंदाच्या पावसाळी अधिवेशनात शाळांमध्ये पहिलीपासूनची हिंदी भाषेची सक्ती, शक्तीपीठ महामार्ग आणि कर्जमाफीच्या मुद्द्यावरुन विरोधकांकडून महायुती सरकारला घेरले जाण्याची शक्यता आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे 29 जूनला प्रथेप्रमाणे चहापानाचा कार्यक्रम होईल. या कार्यक्रमाला विरोधक उपस्थिती लावणार की नाही, हे बघावे लागेल. या अधिवेशनाच्या निमित्ताने विरोधी पक्षातील आमदार विविध समस्या आणि मुद्द्यांवरुन सरकारला घेरण्याचा प्रयत्न करतील. या सगळ्याला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि महायुती सरकारचे मंत्री कशाप्रकारे सामोरे जाणार, हे बघावे लागेल. विधिमंडळाचे अधिवेशन हे विविध समस्या आणि मुद्द्यांवरुन सरकारला घेरण्याची उत्तम संधी असते. मंत्र्यांना विरोधकांनी सभागृहात विचारलेल्या प्रश्न आणि समस्यांबाबत अधिकृतरित्या सर्वांसमोर भूमिका मांडावी लागते. त्यामुळे विरोधक सत्ताधाऱ्यांना अडचणीचे प्रश्न विचारु शकतात. सध्या राज्यात शाळांमधील पहिली भाषेपासूनच हिंदी विषयाची सक्ती आणि शक्तीपीठ महामार्गाचा मुद्दा गाजत आहे. त्यामुळे अधिवेशनात याचे पडसाद उमटू शकतात.




# वाहतूक कोंडी फोडण्यासाठी बदलापूरातील चौकांचे रूंदीकरण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूरः** कुळगाव बदलापूर नगरपालिका क्षेत्रात गेल्या काही महिन्यात मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर कोंडी होत असल्याचे चित्र होते. त्यावर उपाय म्हणून कुळगाव बदलापूर नगरपालिका प्रशासनाने शहरातील महत्वाचे चौक रूंद करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शहरातील १४ ठिकाणच्या चौकातील अडथळे हटवण्यात आले असून या ठिकाणी सिग्नल यंत्रणाही बसवली जाते आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे अरूंद असलेले चौक विस्तीर्ण होत आहेत. बदलापूर पूवर्वेतील ९ तर पश्चिमेतील ५ चौकांचा समावेश आहे. अनेक चौकांमध्ये झाडांचा, काही वास्तूंचा आधार घेत हातगाड्या लागत होत्या. काही ठिकाणी इमारत उभारणाऱ्यांनी सार्वजनिक चौकाची जागाही गिळली होती. अशा सर्व गोष्टींमुळे बदलापूर पूर्वेतील कर्जत राज्यमार्गावर कायम कोंडीत होते. तसेच अंतर्गत रस्त्यांवरही वीर भाई कोतवाल चौक, महात्मा गांधी चौक आणि रेल्वे स्थानक परिसरातील चौकात कोंडी होत होती. बदलापूर पश्चिमेतील समर्थ चौक, बेलवलीतील महादू कान्हू चौक, लोटस तलाव परिसर आणि श्री कॉम्पलेक्स, मांजर्लीतील गणेश चौक या ठिकाणी वाहने वळवताना मोठी कोंडी होत होती. त्यामुळे हे चौक मोकळे करण्याची मागणी होत होती.

# काळू धरणग्रस्तांचे पुनर्वसन खापरी गावात नको – ग्रामस्थांची भूमिका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** ठाणे जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यासाठी तालुक्यातील काळू नदीवरील प्रस्तावित धरणग्रस्तांचे पुनर्वसन खापरी गावात नको अशी भूमिका खापरी ग्रामस्थांनी घेतली असून शासनाच्या या निर्णयावर आक्षेप घेत त्यांनी तहसिलदार यांना निवेदन दिले आहे.

मुरबाड, शहापूर तालुक्यातील खेडोपाड्यांसह दुर्गम भागातील वस्ती आजही पाण्यावाचून वंचित असून धरण उशाला तर कोरड घश्याला अशी जनतेची परिस्थिती झाली आहे. कोट्यावधींच्या जलजीवन मिशन योजनाही ठेकेदारांच्या घश्यात गेल्या असून प्रस्तावित काळू धरणाचा फायदा धनदांडगे आणि शहरांना होणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे. धरणाचा फायदा शहरांची तहान भागवण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिकांचा बळी घेतला जातो. कोयना, बारवी, तानसा, भातसा, ही धरण बांधून मुंबईकर पाणी पित आहेत. मात्र ज्यांच्यावर अन्याय झाला ते चाळीस पन्नास वर्ष न्यायासाठी झगडत आहेत. आता असाच घाट मुरबाड तालुक्यात काळु धरण बांधण्याचा घातला जात आहे. धरण परिसरातील गावे उध्वस्त होणारच आहेत. परंतू त्यांचे पूनर्वसन खापरी, बळेगांव, सायले इत्यादी गावात करून या गावांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय समतोल बिघडवण्याचे काम शासन करु पाहत आहे, अशी येथील ग्रामस्थांची भावना निर्माण झाली आहे. धरणात बाधीत होणाऱ्या गावांना धरण पाहिजे असेल तर जरूर करा पण, आमच्या गावात त्यांचे पूनर्वसन नको अशी भूमिका खापरी ग्रामस्थांची असून तसे निवेदन त्यांनी मुरबाड तहसीलदारांना दिले आहे.

# त्रिभाषा सूत्राबाबतचे दोन्ही शासन निर्णय रद्द


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकवली जाण्याच्या निर्णयाला कठोर विरोध केला जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्य सरकारने तसा निर्णय घेतला होता. मात्र सरकारच्या या निर्णयाला मोठ्या प्रमाणात विरोध करण्यात आला होता. आता हाच विरोध लक्षात घेऊन राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबतचे दोन्ही निर्णय रद्द केले आहेत. तसेच एका समितीची स्थापना केली असून या समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील भूमिका ठरवली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. हिंदी भाषा विषय लागू करण्याबाबतच्या निर्णयावर चर्चा करण्यासाठी आज मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सांगोपांग चर्चा झाल्यानंतर सरकारने त्रिभाषा सूत्रानुसार हिंदी भाषेचा समावेश करण्याबाबतचे दोन्ही जीआर सरकारने रद्द केले आहेत. तशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत केली. तसेच, या समितीचा अहवाल आल्यानंतरच त्रिभाषा सूत्र या रिपोर्टच्या आधारावच लागू केला जाईल. म्हणूनच 16 एप्रिल 2025 आणि 17 जून 2025 हे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. हे दोन्ही शासन निर्णय आम्ही रद्द करत आहोत, अशी घोषणाही फडणवीस यांनी केली.


**"त्रिभाच्या सूत्रांच्या संदर्भात तिसरी भाषा कुठल्या वर्गापासून लागू करावी? ती कशा प्रकारे करावी? मुलांना कोणता पर्याय द्यावा? याबाबतचा निर्णय घेण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्त्वात एका समितीची स्थापना करण्यात येईल. नरेंद्र जाधव हे कुलगुरू होते, ते नियोजन आयोगाचे सदस्य होते. आपण त्यांना शिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळखतो. त्यामुळे त्यांच्या नेतृत्त्वात एका समितीची स्थापना केली जाईल. यात आणखी काही सदस्य असतील. त्यांचीही नावे लवकरच घोषित केली जातील, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.**



**"मराठी माणूस एकत्र येऊ नये यासाठी भाजपने प्रयत्न केला. पण मराठी एकजुटीसमोर त्यांना नमावे लागले. एकत्रित मोर्चा होऊ नये यासाठी त्यांनी प्रयत्न केला. पण यापुढे संकट आल्यावर जागे व्हायचे असं नको. मराठी माणसाच्या दबावामुळे राज्य सरकारने हा जीआर रद्द केला. मराठी माणसाच्या शक्तीपुढे सरकारची सक्ती हरली. त्यामुळे ही एकजुट कायम राहावी असं उद्धव ठाकरे म्हणाले.**



**"इयत्ता पहिलीपासून तीन भाषा शिकवण्याच्या नावाखाली हिंदी भाषा लादण्याचा निर्णय एकदाचा मागे घेतला. सरकारने या संबंधातील २ जीआर रद्द केले. याला उशिरा आलेलं शहाणपण म्हणता येणार नाही, कारण ही सक्ती फक्त आणि फक्त मराठी जनतेच्या रेट्यामुळे मागे घेतली गेली. हिंदी भाषेसाठी सरकार इतका अट्टाहास का करत होतं आणि यासाठी सरकारवर नक्की कुठून दबाव होता, हे मात्र अजून गूढच आहे.**



# भाजप प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा रवींद्र चव्हाणांच्या हाती?

## आज अर्ज दाखल करणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई - भारतीय जनता पक्षातील प्रदेशाध्यक्षांच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला असून नव्या प्रदेशाध्यक्षांची घोषणा येत्या १ जुलै रोजी होईल. प्रदेशाध्यक्षपदाची माळ अपेक्षेप्रमाणे माजी मंत्री आणि पक्षाचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या गळ्यात पडणार आहे, तर मुंबई अध्यक्ष असलेल्या आशिष शेलार यांची मंत्रिपदी वर्णी लागल्याने आ. प्रवीण दरेकर यांना त्या जागी संधी मिळू शकते. मुंबई बँकेचे अध्यक्ष असलेल्या दरेकर यांच्यावर महापालिका निवडणुकीच्या तोंडावर पक्ष मोठी जबाबदारी सोपविण्याच्या तयारीत आहे. याच दिवशी पक्षाकडून राष्ट्रीय परिषदेतील सदस्यांच्या नावांचीही घोषणा करण्यात येईल. दरम्यान, रविवारी २९ जून रोजी पक्षाच्या राज्य परिषद सदस्यांची नावेही जाहीर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### असा असेल निवडणूक कार्यक्रम

**पक्षातर्फे शुक्रवारी रात्री प्रदेश अध्यक्ष पदाच्या तसेच राष्ट्रीय परिषद सदस्य निवडणुकीच्या कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार २९ जून रोजी पक्षाच्या राज्य परिषद सदस्यांची घोषणा करण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय परिषद सदस्य निवडीचा कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे. ३० जून रोजी भाजपा प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. दुपारी ३ ते ५ या वेळात हे अर्ज दाखल करता येतील. १ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता प्रदेश अध्यक्षांच्या व राष्ट्रीय परिषद सदस्यांच्या निवडीची घोषणा करण्यात येईल, अशी माहिती प्रदेश निवडणूक अधिकारी आ. चैनसुख संचेती यांनी दिली आहे.**









## वाचक मनोगत

### वाढती बालगुन्हेगारी भविष्यासाठी धोक्याची घंटा

क्रिकेट खेळण्याच्या किरकोळ वादातून आठवीतील विद्यार्थ्याने नववीतील विद्यार्थ्याचा चाकूने भोसकून खून केल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगर शहरातील नामांकित शाळेत घडली. या घटनेने राज्यभर खळबळ उडाली आहे. अर्थात अल्पवयीन मुलाने केलेला हा पहिलाच गंभीर गुन्हा नाही. याआधीही असे अनेक गुन्हे अल्पवयीन मुलांकडून घडले आहेत. गेल्याच वर्षी शाळेची बॅग फाडली या कारणामुळे एका शाळकरी विद्यार्थ्याने दुसऱ्या शाळकरी विद्यार्थ्यावर चाकूने वार केल्याची घटना पुण्यात घडली होती. दोन वर्षापूर्वी क्राईम मालिका पाहून एका अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केल्याची घटना पुण्यातच घडली होती. तीनवर्षापूर्वी एका आठ वर्षीय मुलाने आपल्याच पाच वर्षीय बहिणीवर ब्लेडने वार करून हत्या केल्याची घटना जालना शहरात घडली होती. अल्पवयीन मुलांकडून असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याच्या बातम्या अलीकडे सातत्याने वर्तमानपत्रात वाचायला मिळतात याचाच अर्थ देशात बाल गुन्हेगारी वाढत चालली आहे. सण २०२२ - २३ या एका वर्षात एकट्या पुणे शहरात अशा प्रकारचे २४८ गुन्हे घडले असून पुण्याच्या ग्रामीण भागात १०४ गुन्हे घडले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातच ही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे. जर एकट्या पुण्यात एकावर्षात अल्पवयीन मुलांकडून इतके गुन्हे होत असतील तर संपूर्ण राज्यात आणि देशात अल्पवयीन मुलांकडून किती गुन्हे घडत असतील याची फक्त कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. अर्थात देण्यात आलेली ही आकडेवारी फक्त नोंद झालेल्या गुन्ह्यांचीच आहे. पोलिस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी काही गुन्हे खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण यासारखे गंभीर स्वरूपाचे देखील आहेत. गेल्या काही वर्षात बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे. आजकालची मुले गुन्हेगार बनत आहेत ही अत्यंत धोक्याची व खेदाची बाब आहे. झोपडपट्टीत राहणारे अल्प उत्पन्न गटातील मुले गुन्हेगारीकडे लवकर ओढले जातात असे म्हंटले जाते. त्यांचे आई वडील मोल मजुरीसाठी घराबाहेर राहतात त्यामुळे ते मुलांना योग्य संस्कार देऊ शकत नाहीत परिणामी ही मुले गुन्हेगारीकडे वळतात असा तर्क काढला जातो. पण अहिल्यानगर मधील या व आधीच्या घटनेने हा तर्क चुकीचा ठरवला आहे. वर उल्लेख केलेल्या सर्व घटनेतील मुलांचे पालक उच्चशिक्षित असून हे मुले त्या त्या शहरातील प्रतिष्ठित शाळेतील विद्यार्थी आहेत. याचाच अर्थ सुशिक्षित पालकांचे मुलेही आता गुन्हेगारीकडे वळू लागले आहेत. भारतासारख्या देशात वाढती बाल गुन्हेगारी ही मोठी समस्या बनली आहे. आजकालच्या मुलांमध्ये भाई, दादा, डॉन बनण्याची मोठी क्रेझ आहे. त्यामुळे ते गुन्हेगारीकडे वळत आहेत. अल्पवयीन मुलांच्या टोळ्या, गँग वाढत आहेत. पालकांचे लक्ष नसल्याने चोऱ्या, मारामारी, खून यासारख्या गुन्ह्यात अल्पवयीन मुले अडकत आहेत. या मुलांना वेळीच सल्ला किंवा मार्गदर्शन मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. देशातील बाल गुन्हेगारी वाढत आहे ही धोक्याची घंटा आहे. ती कमी करण्यासाठी मुलांना संस्कारक्षम वयात पालक, शिक्षक, समाज यांच्याकडून योग्य संस्कार व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. लहान वयात मुले काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत याचाही विचार आई वडीलांनी करायला हवा. अभ्यासाकडे मुले दुर्लक्ष का करतात याचाही विचार पालक आणि शिक्षकांनी करायला हवा. शिक्षणाऐवजी मुले गुन्हेगारीकडे वळत आहे ही चिंतनीय बाब आहे याला जितकी सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे तितकीच कौटुंबिक परिस्थिती देखील जबाबदार आहे. आपल्या देशात जोवर एकत्र कुटुंब पद्धती होती तोवर बाल गुन्हेगारीचे प्रमाण नगण्य होते पण एकत्र कुटुंब पद्धतीचा रहास झाला आणि बाल गुन्हेगारी फोफावत गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पालक वाट्टेल ते करतात. त्यांना मोठ मोठ्या इंटरनॅशनल स्कूलमध्ये लाखो रुपये डोनेशन देऊन दाखल करतात. त्यांना हव्या त्या सर्व वस्तू पुरवतात पण मुलांसोबत वेळ घालवण्यास पालकांना फुरसत नसते. त्रिकोणी, चौकोनी कुटुंब पद्धतीत आजी आजोबा ही संकल्पना केंव्हाच मागे पडली आहे. आई वडील दोघेही नोकरीस असेल तर मुले दिवसभर घरी एकटीच असतात अशावेळी टीव्ही आणि मोबाईल हेच त्यांचे साथीदार असतात. मग दिवसभर टीव्ही वरील क्राईम मालिका पाहणे आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळणे हाच त्यांचा उद्योग. दिवसभर क्राईम मालिका पाहून आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळून मुलांच्या मनातही हिंसक विचार येतात. त्यातूनच मग अशा घटना घडतात. त्यामुळेच आज मूल्यशिक्षणाची मोठी गरज निर्माण झाली आहे.

आज मुलांना जितकी शिक्षणाची गरज आहे तितकीच मूल्यशिक्षणाचीही आहे. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आकडेवारीत मूल्यशिक्षण हरवत चालले आहे. मुलांवर संस्कार करण्यात पालक, शिक्षक आणि समाज कमी पडत आहे. मुलांवर संस्कार होण्यासाठी मूल्यशिक्षणाला पर्याय नाही.

**श्याम ठाणेदार**

# नादुरुस्त शाळांची जि.प. प्रशासनाकडून गंभीर दखल

### दुरावस्था झालेल्या शाळांना मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे विशेष भेट देणार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** आपल्या सक्रिय सहभागातून विविध योजना, अभियान, शासनाचे उपक्रम व इतर अनेक घटक तळागाळातील लोकापर्यंत पोहचवून ठाणे जिल्हा परिषदेला राज्यात प्रथम क्रमांकावर पोहचविणारे जिल्हाचे संवेदनशील, कर्तव्यनिष्ठ मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी जिल्ह्यातील 'अंगणवाडया व नादुरुस्त शाळा, यांच्या संदर्भात विविध दैनिकातून बातम्या प्रसिद्ध होताच याची तात्काळ दखल घेऊन या सर्व शाळांची पाहणी करण्याचे आदेश शाखा अभियंता यांना दिले असून अतिशय गंभीर अशा, शाळा व अंगणवाडया ची ते स्वतः विजीट करून पाहणी करणार आहेत, त्यामुळे त्यांच्या या कृतीचे नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे. खरे तर, ठाणे जिल्ह्याला लाभलेले संवेदनशील, कर्तव्यनिष्ठ, प्रत्येक उपक्रमात, अभियानात किंवा शासनाच्या योजनेत स्वतः सक्रिय सहभागी होऊन आपल्या खांद्यावर जबाबदारी घेऊन ती समर्थपणे पार पाडणा-या,आणि यशस्वी नेतृत्व म्हणून उदयाला येत असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या प्रशासनाच्या विरोधात बातमी लिहायला मन धजवत नाही, कारण सतत काम करणाऱ्या, जिल्ह्यातील नागरिकांचा विचार करणा-या अशा नेतृत्वाला, प्रशासनातील वरीष्ठ अधिका-यापासून ते खालच्या शिपाई पर्यंत सर्वानीच आपल्या कृतीतून साथ द्यायला हवी, इतकेच नव्हे तर, समाजातील बुध्दीजीवी वर्ग, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, समाजसेवक, समाजसुधारक, नागरिक यांनी ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायला हवं, परंतु इतक्या मोठ्या विस्तीर्ण अशा ठाणे जिल्ह्यात अजूनही काही सुधारणा होणे गरजेचे आहे म्हणून पत्रकार संजय कांबळे व त्यांच्या इतर पत्रकार मित्रांनी जिल्ह्यात अंगणवाडया व नादुरुस्त शाळांची सचित्र वस्तुस्थिती प्रसिद्ध केली,याची तात्काळ दखल सीईओ श्री घुगे यांनी घेऊन या विभागाचे शाखा अभियंता यांना तातडीने या सर्व शाळाची पाहणी करण्याचे आदेश दिले, इतक्यावरच न थांबता, त्यांनी पत्रकार संजय कांबळे यांना संपर्क साधून जिल्ह्यातील ज्या शाळा, अंगणवाडया, गंभीर स्थितीत आहेत, अशा शाळांना मी स्वतः विजीट करणार असल्याचे त्यांनी सांगितले, तसेच अशा शाळांची यादी त्यांनी आपणांस देण्यास सांगितले.

त्यामुळे अशा संवेदनशील, कर्तव्यनिष्ठ मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांना पाठिंबा देणे, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही माझ्या सह आपल्या सर्वांची जबाबदारी, कर्तव्य, आहे.

## सुधागड पाली बसस्थानकाची दुरवस्था - परिवहनमंत्र्यांना निवेदन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**सुधागड :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात असलेल्या पाली स्थानकाच्या दुरवस्थेबाबत महाराष्ट्र राज्याचे परिवहनमंत्री ना. प्रताप सरनाईक यांना सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे यांच्यावतीने निवेदन देण्यात आले. यावेळी ठाणे ते पाली-कोशिंबळे बस नियमित वेळेवर सुरू असावी व नवीन बस सायंकाळी 4:30 वाजता वाढविण्याची मागणीही सुधागडवासीयांतर्फे करण्यात आली. मा ना. सरनाईक साहेब यांनी तत्काळ पालीसाठी 2 बस फेऱ्या वाढविण्याचे आदेश संबंधित बस डेपो अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे अध्यक्ष विठ्ठल घाडगे, उपाध्यक्ष वसंत लहाने, संपर्कप्रमुख सुनिल तिडके, शाखाप्रमुख अनिल भोईर, सल्लागार विठ्ठल खेरटकर, गणपत डिगे, रमेश सागळे, कार्याध्यक्ष प्रकाश शिलकर, क्रीडासमिती प्रमुख राकेश थोरवे, प्रसिद्धी प्रमुख अजय जाधव, सांस्कृतिक समिती प्रमुख जनार्दन घोंगे, उपखजिनदार विजय जाधव, हिशेब तपासनीस दत्ता सागळे, प्रवीण बामणे यांच्यासह श्री भैरवनाथ क्रीडा मंडळ नागशेत ठाणे मुंबई उपनगर सदस्य, कोशिंबळे ग्रामस्थ मंडळ ठाणे मुंबई सदस्य आणि सुधागडवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्रातील अष्टविनायकाचे प्रख्यात धार्मिक स्थळ व सुधागड तालुक्यातील मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या पालीतील बसस्थानकाचे नूतनीकरण मागील पाच वर्षांपासून ठप्प आहे. तसेच स्थानकाला खड्डे, पाणी, चिखल, दुर्गंधी आदी विविध समस्यांनी वेढले आहे. परिणामी, येथील प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. याबाबत परिवहनमंत्री ना. प्रताप सरनाईक यांना निवेदन देण्यात आले. तसेच ठाणे शहरात वास्तव्यास असलेल्या सुधागड पाली वासियांना एसटी बस हे एकमेव साधन प्रवासासाठी असल्याने वाढत्या लोकसंख्येच्या मानाने बसफेरींमध्ये वाढ करण्याची मागणीदेखील सुधागडवासियांतर्फे करण्यात आली.

पाच वर्षांपूर्वी पाली बस स्थानकाची जुनी धोकादायक इमारत तोडण्यात आली आहे. त्यावेळी स्थानक आवारात तात्पुरत्या स्वरूपाची निवारा शेड बांधण्यात आली. मात्र त्यानंतर पाच वर्षे उलटून गेली तरी आजतागायत परिवहन महामंडळ अथवा कंत्राटदाराकडून तेथे कोणत्याही स्वरूपाचे काम सुरू करण्यात आलेले नाही. जुन्या इमारतीचे डेब्रिज व राडारोडा स्थानकात तसाच पडला आहे. स्थानकातील नाल्याचा स्लॅब तुटलेला आहे. त्यामुळे बस ये-जा करण्यास अडथळा येतो. स्थानक आवारात पालीतील नाले व गटारांतील सांडपाणी येते. पावसाळ्यात एसटी स्थानकाचा हा परिसर पूर्णपणे जलमय झाल्याने बस वाहतूक ठप्प होते.

अशावेळी गाव-पाड्यांमध्ये जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे. दरम्यान, परिहवनमंत्री ना. प्रताप सरनाईक यांनी पेण डेपोमधील परिवहन अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा करून लवकरच पाली स्थानकाच्या नुतनीकरणाची कार्यवाही सुरू करण्याचे आश्वासन उपस्थित सुधागडवासी शिष्टमंडळाला दिले.

## हिंदी भाषा सक्ती विरोधात मुरबाड मध्ये उबाठा पक्षाची निदर्शने!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दिलिप पवार**

**मुरबाड :** मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा आहे. हिंदी भाषा जरी राष्ट्र भाषा असली तरी महाराष्ट्रात मराठी इयत्ता 1 ते 4 थीच्या वर्गांना शाळांमध्ये हिंदी भाषा सक्तीची करू नये . महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या महाराष्ट्र विरोधी भुमिकेला आज मुरबाड तालुक्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मुरबाड पोलीस स्टेशन समोर छत्रपती शिवाजी महाराज चौकात तीव्र निदर्शने करण्यात आली.यावेळी जमलेल्या शिवसैनिकांनी महाराष्ट्र सरकारने काढलेल्या अध्यादेशाची होळी केली व महायुती सरकारच्या विरोधात घोषणा देऊन सरकारचा निषेध करण्यात आला. उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख संतोष विशे यांच्या नेतृत्वाखाली या मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून या मोर्चासाठी उपजिल्हा प्रमुख मधुकर घुडे, ठाणे जिल्हा महिला संघटिका रेखाताई कंटे, जिल्हा सचिव बाळा चौधरी, विधानसभा क्षेत्र संघटक शंकर वडवले,विधानसभा समन्वयक रमेश कुर्ले, तालुका संघटक गुरूनाथ भावार्थे, मुरबाड शहर प्रमुख मंगेश भुसारी,युवा तालुका अधिकारी दिनेश खापरे यांच्या सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.




# रस्त्याअभावी भिवंडीतील आदिवासी पाड्यातील नागरिकांचा जीवघेणा प्रवास

### मुख्यमंत्र्यांसह स्थानिक प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी







दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( प्रतिनिधी )**

केंद्र व राज्य शासन भिवंडी शहर व ग्रामीण भागाच्या रस्त्यांच्या दुरुस्ती करण्यासाठी व नवीन रस्ते तयार करण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी देत आहे मात्र आजही भिवंडी ग्रामीण परिसरात सुसज्ज असे रस्ते नसल्यामुळे नागरिकांना कसे हाल सोसावे लागते याचा एक गंभीर प्रकार भिवंडी तालुक्यातील खारबाव रेल्वे स्थानका जवळील बंगला पाडा येथे उघडकीस आला आहे. या गांव परिसरात 40 घरांची वस्ती असलेल्या आदिवासी पाड्यावर आजही रस्त्यासह ग्रामस्थांना मूलभूत सुविधांचा सामना करावा लागत आहे.या भागात रस्ता नसल्यामुळे महिला,नागरिक आणि शाळकरी विद्यार्थी दररोज दिवा वसई रेल्वेमार्गावरील रुळ ओलांडून तर कधी रस्त्यात आडव्या उभ्या असलेल्या मालगाडी खालून जीवघेणा प्रवास करत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत लक्ष द्यावे अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

रेल्वे फाटक किंवा सुरक्षित मार्ग उपलब्ध नसल्यामुळे थेट रेल्वे रुळ ओलाडण्याची नामुष्की येथील महिला व ग्रामस्थ, शाळकरी मुलांवर येऊन ठेपली आहे,जे अत्यंत धोकादायक आहे.या प्रवासाचा व्हिडिओ स्थानिकांनी समाज माध्यमावर व्हायरल केला आहे.पावसाळ्यात रेल्वे पुला खाली पाणी जमा होत आहे.तर कॉरिडॉर रेल्वे मार्गाचे काम सुरू असल्याने तो मार्गही बंद असतो.त्यामुळे वाहनांसाठीही रस्ता नसल्यामुळे आजारी व्यक्तींनाही उचलून रुळ ओलांडून घेऊन जावे लागत आहे.

गावकऱ्यांची रेल्वेखालून भुयारी मार्ग अथवा फूट ओव्हर ब्रिज उभारण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे.राज्य सरकार प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे अशी अपेक्षा ग्रामस्थ महिला हर्षदा चौधरी यांनी केली आहे.

# एकवीरा देवीच्या दर्शनासाठी ड्रेस कोड लागू

### सात जुलै पासून भक्तांसाठी नियमावली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :: धनाजी घरत**

आगरी कोळी बांधवांसह राज्यभरातील लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या एकविरा आईच्या मंदिरात ७ जुलै २०२५ पासून नवीन ड्रेस कोड लागू केला जाणार आहे. अंगप्रदर्शन करणाऱ्या कपड्यांवर बंदी घालण्याचा निर्णय कार्ला एकविरा आई ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाने घेतला असून, या निर्णयाची माहिती ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त यांनी दिली आहे. शुक्रवारी पार पडलेल्या ट्रस्टच्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला. यामध्ये मंदिराच्या पावित्र्याच्या दृष्टीने शॉर्ट, मिनी स्कर्ट, फाटकी जीन्स, हाफ पँट यांसारख्या आधुनिक व अंगप्रदर्शन करणाऱ्या वेशभूषेला बंदी घालण्यात आली आहे. ड्रेस कोडनुसार महिला भक्तांनी साडी, सलवार-कुर्ता किंवा पूर्ण शरीर झाकणारे पारंपरिक कपडे परिधान करणे अपेक्षित आहे, तर पुरुषांनी धोतर, कुर्ता-पायजमा, पँट-शर्ट किंवा टी-शर्टसारखे सुसंस्कृत कपडे वापरणे अपेक्षित आहे.विशेष म्हणजे, मंदिरातील कर्मचाऱ्यांनी भक्तांशी शिष्टाचाराने वागावे, त्यांच्यावर आरडा ओरड करू नये, अशा सूचनाही ट्रस्टने कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. भक्तांनीही नियमांचे पालन करून शांततामय वातावरणात देवीचे दर्शन घ्यावे, असे आवाहन मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. या सभेत प्रमुख विश्वस्त खा. सुरेश म्हात्रे, अध्यक्ष दिपक हुलावळे, वरिष्ठ उपाध्यक्ष मारुती देशमुख, उपाध्यक्ष सागर देवकर, सचिव नवनाथ देशमुख, सहसचिव महेंद्र देशमुख, खजिनदार संजय गोविलकर, सहखजिनदार विकास पडवळ, विश्वस्त पूजा पडवळ आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, या निर्णयाची अंमलबजावणी सोमवार, दि. 7 जुलैपासून करण्यात येणार आहे. त्यामुळे सोमवारपासून कार्ला गडावर आई एकविरा देवीच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांसाठी ड्रेसकोड अनिवार्य आहे. ड्रेसकोड नसेल तर मंदिरात प्रवेश दिला जाणार नाही, असे ही कळविण्यात आले आहे.

**काय परिधान करावे?**

**महिलांनी व मुलींनी साडी, सलवार-कुर्ता किंवा इतर भारतीय पारंपरिक कपडे घालावे की, त्याने पूर्ण अंग झाकलेले असेल. तसेच, पुरुषांनी व मुलांनी धोतर, कुर्ता, पायजमा कुर्ता, पॅन्ट-शर्ट, टी-शर्ट किंवा इतर भारतीय पारंपरिक कपडे घालावेत जेणेकरुन त्याने पूर्ण अंग झाकलेले असेल. शॉर्ट्स, शॉर्ट स्कर्ट, वेस्टर्न कपडे मिनी स्कर्ट्स, रिप्ड जीन्स, फाटके जीन्स, हाफ पॅन्ट किंवा अंगप्रदर्शन करणारे कपडे, हे सर्व कपडे घालू नये. सर्व भाविकांनी, दुकानदारांनी तसेच स्थानिक मंडळींनी मदिराच्या पावित्राचे जतन करण्यासाठी या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे, असे आवाहन श्री एकविरा देवस्थान ट्रस्टच्यावतीने करण्यात आले आहे**

## आमदार रवींद्र चव्हाण समर्थकांची डोंबिवलीत बॅनरबाजी




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** भाजपचे आमदार तथा महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी संभाव्य निवडीच्या पार्श्वभूमीवर डोंबिवलीत अभिनंदनाचे बॅनर झळकले आहेत.

सर्व करतील गर्व, असं असेल पर्व! अशा शब्दांसह रवींद्र चव्हाण यांचा फोटो या बॅनरवर लावण्यात आला आहे. विशेष म्हणजे आमदार रवींद्र चव्हाण हे ३० जून रोजी अधिकृतरित्या महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल करणार असून १ जुलै रोजी सकाळी ११ वाजता वरळी डोम येथे प्रदेशाध्यक्षपदाच्या निवडीची अधिकृत घोषणा होणार आहे. मात्र याआधीच आमदार रवींद्र चव्हाण यांचे समर्थक आणि भाजप कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचे बॅनर लावून आनंद व्यक्त केला आहे.






**सोमवार**

**30 जून 2025**

| | | | |
|---|---|---|---|
| **मेष** | **वृषभ** | **मिथुन** | **कर्क** |
| विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला आहे.आज तुमच्या घरी लहान पाहुणे येण्याची शक्यता आहे. | संपत्तीत वाढ होईल. आज तुमच्या दिवसाची सुरुवात चांगल्या मूडने होणार आहे. | महिलांसाठी दिवस उत्तम राहील. व्यावसायिक महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित राहू शकतात. | आज तुमचा दिवस संमिश्र जाईल. एकाग्र चित्ताने केलेले काम फायदेशीर ठरेल. |
| **सिंह** | **कन्या** | **तूळ** | **वृश्चिक** |
| तुमच्या प्रियकरासाठी दिवस चांगला आहे. तुमचे आरोग्य चांगले राहील. | काम कमीत कमी वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल. जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडाल. | दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. घर खरेदी करण्याचा विचार करणाऱ्या लोकांसाठी दिवस शुभ | व्यवसाय करणाऱ्या लोकांचा व्यवसाय चांगला होईल. तुमच्या प्रियकरासाठी दिवस चांगला |
| **धनु** | **मकर** | **कुम्भ** | **मीन** |
| नवीन वाहन खरेदी करण्याचा निर्णय घ्याल. आज तुमचा दिवस आनंदाने भरलेला जाणार आहे. | तुमचे मित्र तुम्हाला मदतीसाठी विचारतील, तुम्ही त्यांना निराश करणार नाही. | व्यवसाय करणाऱ्या लोकांना चांगला नफा मिळेल. आज तुम्ही महत्त्वाच्या बैठकीला जाल. | वडिलांचा सल्ला तुम्हाला तुमच्या व्यवसायात मदत करेल. गरजू व्यक्तीला मदत कराल. |

## आजपासून डोंबिवलीतील नागरिकांसाठी 'जगन्नाथ कॉमर्स प्लाझा' येथे नागरीक सुविधा केंद्र सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** डोंबिवलीतील नागरिकांच्या सुविधेसाठी आता डोंबिवली पूर्वेतील 'जगन्नाथ कॉमर्स प्लाझा' येथे उद्यापासून नागरीक सुविधा केंद्र सुरू!कल्याण डोंबिवलीतील नागरिकांना त्यांचा मालमत्ता कर व पाणी देयकाचा भरणा करण्यासाठी सोयीचे जावे म्हणून महानगरपालिकेने, महापालिकेच्या प्रभागांत तसेच महापालिका मुख्यालय, जुने डोंबिवली विभागीय कार्यालय येथे नागरीक सुविधा केंद्राची सुविधा उपलब्ध करून दिली होती.तथापि डोंबिवली रेल्वे स्थानकानजीकच्या जुन्या विभागीय कार्यालयाची इमारत धोकादायक झाल्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी जुन्या विभागीय कार्यालयातील नागरिक सुविधा केंद्र आता जगन्नाथ कॉमर्स प्लाझा, पहिला मजला ,जुने एलबीटी ऑफिस, मानपाडा रोड टिळक नगर डोंबिवली( पूर्व) येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.येत्या सोमवारपासून म्हणजेच दिनांक 30 जून 2025 पासून सदर नागरिक सुविधा केंद्र नागरिकांच्या सेवेसाठी सकाळी दहा वाजल्यापासून सुरू करण्यात येत आहे.तरी डोंबिवलीच्या फ आणि ग प्रभागातील नागरिकांनी आपला मालमत्ता कर आणि पाणी देयके भरण्यासाठी "जगन्नाथ कॉमर्स प्लाझा" येथे भेट द्यावी असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# दत्तक योजनेतून क्षयरूग्णांची रोगमुक्ती
## भिवंडीतील सामाजिक संस्थेचा संकल्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

❍ शरद भसाळे

**भिवंडी :** भिवंडी शहरातील जायट्स ग्रुप भिवंडी व वांगणी,तसेच इंडियन वूमन अँड चिल्ड्रन फाउंडेशन (आय.डब्लू.सी. फाउंडेशन) या स्वयंसेवी संस्थेतर्फे क्षय रोग रुग्णांना दत्तक घेऊन पुढील एका वर्षासाठी नियमीत

प्रत्येक महिन्याला सकस आहार देऊन त्याना क्षय आजार मुक्त करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.त्यामुळे महापालिका प्रशासन व नागरिकांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक करीत त्यांच्या या उपक्रमाचे स्वागत केले आहे.भिवंडी मनपाच्या कामतघर भाग्यनगर आरोग्य केंद्रात हा कार्यक्रम सकाळी संपन्न झाला.

भिवंडी शहरातील विविध



भागात सुमारे ३५०० हजार क्षय रोग रुग्ण असुन त्यांना अनेकवेळा योग्य उपचार मिळत नसल्याने ते रूग्ण दगावल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

भारत देश क्षय रोग आजार मुक्त झाला पाहिजे यासाठी आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढाकार घेत त्यांनी सामाजिक संस्था व पदाधिकाऱ्यांनी या रुग्णांना दत्तक घेऊन त्यांना सकस आहार नियमित देऊन निक्षय भारत निर्माण करावा आणि २०२५ अखेर पर्यंत देशात क्षय रोगाचे उच्चाटन करावे असे आवाहन केले आहे. त्यामुळे

पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन भिवंडीतील आय.डब्लू.सी फाउंडेशन या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर जाधव यांनी १० क्षय रूग्ण पुढील एक वर्षासाठी दत्तक घेऊन त्याना आजारमुक्त करण्याचा संकल्प केला आहे.त्याना तांदूळ,गहू,डाळ, शेंगदाणे, ऑइल, खजूर, चणे, गूळ

> **संस्थेने या रुग्णाच्या मुलांचा शिक्षणाचा खर्च उचलला आहे. यावेळी ३० मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप देखील करण्यात आले. त्यांच्या शिक्षणात देखील काही खंड पडणार नाही म्हणून संस्था त्यांचा ही खर्च उचलणार असल्याची माहिती जाधव यांनी दिली.**

अश्या प्रकारचं सकस आहाराचे किट तयार करून कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले भिवंडी मनपाच्या वैद्यकीय क्षयरोग विभाग प्रमुख डॉ. बुशरा सय्यद शेख,जायट ग्रुप भिवंडी माजी अध्यक्ष अँड.गगन जैन, विनय जी.कामगार नेते श्रीपत तांबे,सुरज खरे, अंकुश बचूटे, एस.मोहम्मद, अमोल भोईर, राजेश वाघमारे, डी. एस. गायकवाड, विष्णूबुवा करंडे, विठोबा सोनवणे, कल्पेश घाडगे, मंगेश जाधव अदि मान्यवरांच्या हस्ते रूग्णांना वाटप करण्यात आले.

शासनाच्या माध्यमातून रुग्णांची देखरेख केली जाते व नियमित तपासणी केली जाते,औषध उपचार केले जातात तथा पोषक आहार देखील दिला जातो परंतु अनेकदा त्रुटी निर्माण होत असतात त्यामुळे शासनाला सहकार्य म्हणून इंडियन वूमन अँड चिल्ड्रन फाउंडेशन व जायट्स ग्रुपच्यावतीने हा उपक्रम हाती घेण्यात आल्याची माहिती प्रभाकर जाधव यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात दिली.यावेळी डॉ.बुशरा सय्यद,जायट ग्रुपचे माजीअध्यक्ष गगन जैन यांच्या सह यांनी सुद्धा मार्गदर्शन करून या उपक्रमाचे कौतुक केले.

# आगामी निवडणुकांसाठी १९ कोटी ९० लाखांचा प्रस्ताव

निवडणुकीसाठी ठाणे पालिका प्रशासन तयारीला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २९ :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका लवकर घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार ठाणे महापालिका निवडणुकीचे वेध सर्वच राजकीय पक्ष आणि इच्छुकांना लागले असून, त्यांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. त्यात आता प्रशासनही जोरात तयारीला लागले आहे. या निवडणुकीत राजकीय पक्षांकडून प्रचारासह मोठ्या प्रमाणात पैशांचाही धुरळा उडणार हे निश्चित आहे; मात्र यंदा प्रशासकीय खर्चही पाच कोटींनी वाढणार आहे. २०१७च्या सार्वत्रिक निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी ठाणे महापालिका प्रशासनाला १५ कोटी ३० लाख ३४ हजार रुपयांचा खर्च आला होता; मात्र यंदा वाढती महागाई आणि वाढलेल्या मतदारसंख्येमुळे २०२५मध्ये होणाऱ्या निवडणुकीत १९ कोटी ९० लाखांचा खर्च अपेक्षित धरला आहे.

२०१७ मध्ये ठाणे महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक झाली होती. त्यानंतर तब्बल आठ वर्षांनंतर पुन्हा एकदा पालिका निवडणुकीचा धुरळा उडणार आहे. ठाणे महापालिकेवर सध्या शिवसेना शिंदे गटाची सत्ता आहे. केंद्रात आणि राज्यात महायुतीचे सरकार असले तरी ठाणे महापालिकेवर आपलीच सत्ता कायम ठेवण्यासाठी स त्ताध री



पक्ष कामाला लागला आहे. माजी नगरसेवकांना पुन्हा एकदा संधी मिळण्याची शक्यता असली तरी त्यातही फेरबदर होण्याचे संकेत आहेत. दुसरीकडे भाजपनेही आपली ताकद वाढवण्यास सुरुवात केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती, महाविकास आघाडी होईल किंवा नाही याची चाचपणी करीत सर्वच राजकीय पक्ष आणि इच्छुक कामाला लागले आहेत. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अनेक इच्छुकांनी वह्या वाटप, छत्री वाटप, आरोग्य शिबिरे आयोजित केली आहेत. या वेळी दहीहंडीपासून ते नवरात्री उत्सवापर्यंत सगळीकडेच ही चढाओढ पाहायला मिळणार आहे.

राजकीय पातळीवर निवडणुकाची तयारी सुरू झाली आहे. दुसरीकडे निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनही कामाला लागले आहे. सध्या महापालिकेवर प्रशासक आहे. प्रशासकीय राजवटीतच लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडल्या आहेत. या निवडणुकांचा दांडगा अनुभव गाठीशी असल्याने प्रशासनाने त्यादृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. चार प्रभागांचा एक पॅनेल होणार असल्याने नव्याने प्रभाग रचना आखण्यापासून ते मतदान आणि मतमोजणी होईपर्यंत हे कार्य सुरळीत पार पाडण्याची जबाबदारी प्रशासनावर आहे. त्यात प्रशासकीय खर्चाची मोठी जबाबदारी असेल.

निवडणुकीसाठी प्रशासनाचा खर्च तयारीवर, कर्मचाऱ्यांच्या व्यवस्थापनावर आणि इतर आवश्यक कामावर होतो. यात प्रामुख्याने मतदार याद्या अद्ययावत करणे, मतदार केंद्र उभारणे, मतपत्रिका छपाई, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, सुरक्षा व्यवस्था आणि निवडणूक साहित्य खरेदी इत्यादी सर्वच बाबी या खर्चातून भागवाव्या लागतात. त्यासाठी प्रशासनाने सुमारे १९ कोटी ९० लाखांचा खर्च अपेक्षित धरून तसा प्रस्ताव मान्यतेसाठी तयार केला आहे.

# नवी मुंबईतील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा मार्ग मोकळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** बेलापूर सेक्टर १५ ए येथील भूखंड क्रमांक ४ येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल निर्मितीचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागानेही पालिकेने येथील भूखंडाबाबत व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश नुकतेच नवी मुंबई महापालिकेला दिले आहेत.

बेलापूर सेक्टर १५ ए येथे हॉस्पिटलची निर्मिती करण्याची मागणी सातत्याने आमदार म्हात्रे यांनी लावून धरली होती. परंतु याच भूखंडावर स्थानिक क्रिकेट खेळत असल्याने हा भूखंड खेळाचे मैदान म्हणून आरक्षित करण्यासाठी स्थानिकांकडून सातत्याने प्रयत्न केले जात होते. यासाठी नवी मुंबईतील फोर्टी प्लस संघाने पालिका मुख्यालयावर मोर्चा आणत आंदोलनही केले होते. त्यामुळे या भूखंडावरून राजकीय खडाजंगी पाहायला मिळाली होती. या भूखंडाबाबतचा वाद न्यायालयापर्यंत पोहचला होता.

स्थानिक तरुणांनी या ठिकाणी खेळाचे मैदान व्हावे यासाठी प्रयत्न केले होते. पालिकेवर आंदोलन करत पालिका मुख्यालयासमोरच क्रिकेट खेळत भूखंड खेळासाठी आरक्षित व्हावा यासाठी आंदोलन केले होते. परंतू दुसरीकडे आमदार मंदा म्हात्रे यांनी पालिका तसेच शासन दरबारी याबाबत सातत्याने पाठपुरावा करत या भूखंडावर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा आग्रह धरला होता. विकास आराखड्यावर नगविकास विभाग तसेच उपमुख्यमंत्री यांचीही मंजुरीची मोहर उमटली असून हा भूखंड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी आरक्षित झाल्याने आता या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

> **या प्रकल्पामुळे नवी मुंबईच्या सर्वसामान्य नागरिकांना अधिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत. गोरगरीब सर्वसामान्य जनतेला व वैद्यकीय क्षेत्रात उंच झेप घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना आता दिलासा मिळणार आहे.**
> **- मंदा म्हात्रे, आमदार, बेलापूर**
>
> ■■■
>
> **हा भूखंड सिडकोकडून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल या वापरासाठी हस्तांतरित झाला आहे. त्यानुसार या भूखंडाच्या विकास योजनेत खेळाच्या मैदानाऐवजी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल असा वापर बदलण्यात आला आहे. त्याला शासनाकडूनही मंजुरी देण्यात आली आहे.**
> **- सोमनाथ केकाण, सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, नवी मुंबई महापालिका**

# अनधिकृत शाळांविरोधातील बेमुदत शाळा बंद आंदोलन मागे घ्यावे
## ठाणे मनपा शिक्षण विभागाचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
:: प्रतिनिधी

**ठाणे :** प्रतिनिधीठाणे महानगरपालिका क्षेत्रात 81 शाळा अनधिकृत असून त्यामध्ये १९७०८ शिक्षण घेत होते. ठाणे शहरातील अनधिकृत शाळा बंद करण्यासाठी इंडिपेंडेंट स्कूल संघटना, ठाणे यांनी दि.01 जुलै 2025 रोजी बेमुदत शाळा बंद आंदोलनाचा इशारा शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांच्याकडे पत्राद्वारे केला होता. सदर पत्राची व समस्येची गांभीर्याने दखल घेऊन शिक्षण विभागाने अनधिकृत शाळांबाबत प्राधान्याने व सातत्याने केलेल्या कारवाई संदर्भात दि.27 जून 2025 रोजी इंडियन स्कूल संघटनेचे अध्यक्ष/ सचिव यांना पत्र देऊन पुकारलेले बेमुदत शाळा बंद आंदोलन मागे घेण्याचे आवाहन ठाणे महानगरपालिका शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी केले आहे. अनधिकृत शाळांवर कारवाई करताना अनधिकृत शाळांमध्ये पालकांनी त्यांच्या पाल्याचे प्रवेश घेऊ नये. यासाठी व्यापक जनजागृती करण्यासाठी ८१ अनधिकृत शाळांची यादी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच अनधिकृत शाळांना वेळोवेळी कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार कायदेशीर कारवाई करून अनधिकृत शाळांना दंड आकारणी करून सदरचे शाळांवर शासन निर्देशानुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. दंड वसुलीकरण्यासाठी मालमत्ता कर विभागास द्रव्य दंड वसुली करणेबाबत पत्रव्यवहार सुद्धा केलेला आहे व त्याप्रमाणे कारवाई सुरू आहे. पाणीपुरवठा विभागामार्फत अशा शाळांच्या पाणीपुरवठा बंद करण्याची कारवाई सुरू आहे व 32 शाळांचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. विविध संघटनांनी उच्च न्यायालयात अनधिकृत शाळाबंद करण्यासंदर्भात याचिका दाखल केलेली असून सदर याचिकेस शिक्षण विभागाच्या वतीने प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. ८१ अनधिकृत शाळेमधील 19708 विद्यार्थ्यांचे अधिकृत शाळेमध्ये समायोजन करण्यासंदर्भात सर्व मान्यताप्राप्त शाळेच्या व्यवस्थापनाची सहविचार सभा घेण्यात आलेली असून सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कामध्ये सवलत द्यावी असेही मान्य करण्यात आलेले आहे. तसेच विद्यार्थ्यांचे समायोजन नजीकच्या अधिकृत शाळेत करण्यासाठी 09 पथके तयार करण्यात आलेले आहेत.व सर्व विद्यार्थ्यांचे समायोजन करण्याची जबाबदारी त्यांच्यावरती देण्यात आलेली आहे.अनधिकृत शाळांवर कायदेशीर कारवाईसाठी प्रशासन कसोशीने पाठपुरावा करत आहे. शिक्षण हक्क अधिनियम 2009 अन्वये कोणत्याही संस्थेस अथवा शाळेस विद्यार्थ्यांना त्याच्या मुलभूत शैक्षणिक हक्कापासून वंचित ठेवता येत नाही. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित पाहता इंडिपेंडेंट स्कूल संघटना यांनी पुकारलेले आंदोलन मागे घ्यावे असे आवाहन शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी पत्राद्वारे केले आहे.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

### मालमत्ता विभाग

**जाहिर निविदा सुचना क्र. ०३ सन २०२५-२६ (दुसरी मागणी)**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ अन्वयेच्या तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या समावेशक आरक्षणाअंतर्गत दुकान केंद्र (Shopping Center) ही मालमत्ता १० वर्षेसाठी भाडेतत्वावर व्यक्तिंना/संस्थांना देणेबाबत.

१) निविदा विक्री दि. ३०/०६/२०२५ ते दि. १४/०७/२०२५ रोजी वेळ सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत राहील.
२) निविदा स्विकृती दि. ३०/०६/२०२५ ते दि. १४/०७/२०२५ रोजी वेळ सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत राहील.
३) निविदा पूर्व बैठक दि.०९/०७/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता ; मा. उप आयुक्त (मालमत्ता) कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.
४) शक्य झाल्यास दि. १५/०७/२०२५ रोजी सायंकाळी ३.०० वाजता; ई-टेंडरींग विभाग नागरिक सुविधा केंद्र, येथे उघडण्यात येईल.
५) निविदा महापालिकेच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन विक्री व स्विकृती करता येतील.

सर्व निविदा किंवा कोणत्याही निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखुन ठेवला आहे.

जावक क्रमांक : कडोंमपा / जसवि/मुका /२३५
दिनांक : २७/०६/२५

सही/-
उप आयुक्त
(मालमत्ता)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण



महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यवस्थापन विभाग अंबरनाथ
### निविदा सूचना प्रसिध्द करणेबाबत

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) यांनी खालील कामांसाठी दोन लिफाफा प्रणालीतील सीलबंद निविदा फॉर्म आमंत्रित केले आहे. रिक्त निविदा फॉर्म कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.ज.व्य.विभाग, अंबरनाथ या कार्यालयात दिनांक ३०/०६/२०२५ ते ०३/०७/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत जारी केले जातील. या कामाची सीलबंद निविदा दि.०७/०७/२०२५ रोजी १७.०० वाजेपर्यंत किंवा आधी नमूद केलेल्या कोणत्याही कार्यालयात सादर करता येईल आणि शक्य असल्यास खालील नमूद तारखेला व वेळेवर म.जी.प्रा.च्या सक्षम प्राधिकरणाद्वारे उघडल्या जातील.

| अ. क्र. | निविदा सूचना क्रमांक | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | सूरक्षा अनामत रक्कम (४%) (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | को-या निविदा फॉर्मची किंमत रु. | म.जी.प्रा.कडे नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग | सिलबंद निविदा स्विकारण्याचा दिनांक व ठिकाण | सिलबंद निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३ (दुसरा पुकार) सन २०२५-२६ | M & R to Ambernath Water Works - Providing, erecting, testing and commissioning of Battery operated Electromagnetic Flowmeter at Chikhloli Pada & Navare Nagar | ३१०८३७.०० | ३,५००.०० | एकूण रक्कम रु.१२४३४/- (अ) प्रारंभिक रक्कम रु.६२१७/- (ब) चालू देयकातून वसूल होणारी रक्कम रु.६२१७/- | १ महिना | ५९०.०० | वर्ग-ड व त्यावरील (Class-D & above) (विद्युत / यांत्रिक) वर्गाचे कंत्राटदार with MJP / PWD / MIDC / CIDCO / Corporation / ZP or any other Govt. dept. OR Manufacturer / Delear | दि. ०७/०७/२०२५ रोजी १७.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ज.व्य.विभाग, साई विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) | दि. ०८/०७/२०२५ रोजी १२.०० वाजता. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ज.व्य.विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) |

टिप -
१) सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, एमजेपी विभाग, अंबरनाथच्या सूचना फलकावर पाहिली जाऊ शकते. विनंती केल्यास त्याची प्रत विनामूल्य मिळू शकते.
२) अर्जासह खालील कागदपत्रे जमा करणाऱ्या कंत्राटदारांना रिक्त निविदा फॉर्म देण्यात येईल.
अ) वैध नोंदणी प्रमाणपत्र.
ब) रिक्त निविदा फॉर्मच्या किंमतीची भरपाई
क) जीएसटीसाठी नोंदणी प्रमाणपत्र
३) रिक्त निविदा फॉर्म पोस्टद्वारे पाठविल्या जाणार नाहीत. कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतीही कारणे न देता नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणाने राखून ठेवला आहे.

(सही/-)
कार्यकारी अभियंता,
म.जी.प्रा.ज.व्य.विभाग, अंबरनाथ.

"जावक क्रमांक : जिमाका ठाणे/जाहिरात/2025-2026/039

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
ठाणे ■ सोमवार
■ ३० जून २०२५
jeevandeepvartanews2020@gmail.com



# नेवाळी नाक्यावर वाहनांच्या रांगा – वाहतूक पोलिस देखील हतबल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ ता. २९ (वार्ताहर) :** तालुक्यातील नेवाळी नाका हा गेल्या काही वर्षांपासून वाहतूक कोंडीचे केंद्र ठरत आहे. अपुरा चौक, अरुंद होणाऱ्या मार्गिका याचबरोबर अंबरनाथहून मुंबई, ठाणे नवी मुंबईच्या दिशेने ये-जा करणारी वाहने आणि कल्याणहून मलंगगडाच्या दिशेने वाहतूक करणारी अवजड वाहने एकाच ठिकाणी येत असल्याने कोंडी होते. तसेच बेशिस्त चालक आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांमुळे कोंडीत अधिकच भर पडते. दरम्यान, शनिवार, रविवार हे दोन दिवस सुट्टीचे असल्याने मार्गावर अभुतपूर्वक कोंडी होत आहे. अंबरनाथ कटाई राज्य मार्गावर शनिवारी (ता. २८) वेगवेगळ्या ठिकाणी अभूतपूर्व कोंडी झाली होती. कटाईपासून कोळेगाव, कोणी फाटा, नेवाली नाका आणि अंबरनाथ शहराच्या प्रवेशद्वारावर मोठी वाहतूक कोंडी होत असल्याने चालकांना नाहक त्रास सहन करावा लागला. यात नेवाळी नाक्यावर बेशिस्त चालक आणि वाहनांच्या मोठ्या रांगांमुळे वाहतूक पोलिस हातबल झाले होते. विविध ठिकाणी पडलेले खड्डे, अपूर्ण रस्ते, जोड रस्त्यांची सुरू असलेली कामे यामुळे कोंडी होत आहे. त्यात बदलापूर, अंबरनाथ शहरातील प्रवाशांना ठाणे, मुंबई, नवी मुंबई, डोंबिवली या शहरांना जोडण्यासाठी महत्त्वाचा असलेला कटाई, अंबरनाथ राज्य मार्ग कोंडीत सापडत आहे.

# महाराष्ट्र ईसीस मॉड्युल प्रकरणी अटकेत असलेला दहशतवादी साकीब नाचण याचे निधन

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**राजेश दळवी**

**पडघा : दि.२९ :** दहशतवादी कारवाया मध्ये सहभागी व महाराष्ट्र इसीस मॉड्युल प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणांच्या ताब्यात असलेला व मुबंई साखळी बॉम्बस्फोटातील आरोपी साकीब नाचण याचा मृत्यू झाला आहे.



सुंत्राकडुन मिळालेल्या माहितीनुसार मुंबई बॉम्बस्फोटप्रकरणी १० वर्षांची शिक्षा भोगून २०१७ साली बाहेर आलेला भिंवडी तालुक्यातील बोरीवली येथील रहिवासी दहशतवादी साकीब नाचण याला पुन्हा दहशतवादी कारवायासाठी सहभाग व महाराष्ट्र इसीस मॉड्युल प्रकरणी ईसीस मॉड्युल म्होरक्या म्हणून २०२३ मध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणांनी ताब्यात घेतले होते तेव्हांपासून तो दिल्ली येथील जेलमध्ये होता सोमवारी त्याची तब्येत बिघडल्याने त्याला दिल्ली येथील एका सरकारी इस्पितळात दाखल करण्यात आले होते. ब्रेन हॅमरेजमुळे उपचारादरम्यान शनिवारी त्याचा मृत्यू झाला असुन नातेवाईकांनी त्यास दुजोरा दिला असुन खबरदारीचे उपाय म्हणून स्थानिक व ठाणे ग्रामीण पोलीसांनी पडघा बोरीवली गावातील नाक्या नाक्यावर व मुबंई नाशीक महामार्गावरून बोरीवली येथे जाणाऱ्या रस्त्यावर पोलीस बंदोबस्त ठेवला होता. सुरुवातीला बंदी घातलेल्या सिमी या दहशतवादी संघटनेचा प्रमुख पदाधिकारी असलेला साकीब नाचण हा २००३ मधील मुलुंड, विलेपार्ले, मुंबई सेंट्रल या मुंबई साखळी बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी होता. या स्फोटात १३ निरपराध नागरीकांचा मृत्यू तर १४७ सर्वसामान्य नागरीक गंभीर जखमी झाले होते.तसेच देशविरोधी व दहशतवादी कारवायासाठी सहभाग असल्याने साकीब नाचण यांच्यावर वेगवेगळे गुन्हे दाखल होते.

# इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशनच्या विज दरात वाढ

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**मुंबई :** इंधनाच्या वाढत्या किंमतीला कंटाळून अनेक वाहनधारकांनी विजेवरील वाहनांच्या (इलेक्ट्रिक) वापराला सुरूवात केली. परंतू आता त्यांच्याही खिशाला चांगलाच फटका बसणार आहे. १ जुलैपासून इलेक्ट्रिक वाहनांसाठीच्या चार्जिंग स्टेशनला पुरवल्या जाणाऱ्या विजेच्या दरात प्रतियुनिट मागे ५० पैशांहून अधिकची वाढ होणार आहे. त्यामुळे संबंधित वाहनधारकांच्या खिशाला कात्री लागणार असल्याचे निश्चित झाले आहे.

महावितरणने दाखल केलेल्या पुनर्विचार याचिकेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने नुकतेच वीज दर निश्चितीचे आदेश जारी केले. त्यानुसार कमी वीज वापर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना दिलासा तर विजेवरील वाहनांना पुरवल्या जाणाऱ्या विजेच्या दरात पुढील पाच वर्षे वाढ होत राहणार असल्याचे दिसत आहे.

दरवाढीचा इलेक्ट्रिक वाहनांवर परिणाम

पेट्रोल-डिझेलवर चालणा-या वाहनांमुळे इंधन आयात करावे लागत असल्याने त्यावरही परकीय चलन खर्च होते. त्याची दखल घेत वीज आयोगाने पुढील पाच वर्षासाठी बहुवार्षिक वीज दर निश्चित करताना इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग स्टेशनला पुरवल्या जाणाऱ्या प्रतियुनिट विजेचा दर सहा रूपये एवढा निश्चित केला होता. मात्र यंदाची दरवाढ पाहता आयोगाने प्रोत्साहन मोहिम गुंडाळल्याचे दिसत आहे.

# अंबरनाथ : लव्हाळी येथे आरोग्य केंद्राचे उद्घाटन

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण (वार्ताहर) :** स्वामी गोशाळा परिसर लव्हाळी (अंबरनाथ) येथे नवनिर्मित आरोग्य केंद्राचे उद्घाटन रोटरी इंटरनॅशनलचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटेरियन दिनेश मेहता आणि ज्योती मेहता यांच्या हस्ते करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हरसाइडच्या वतीने या उपक्रमाची संकल्पना साकारण्यात आली. या कार्यक्रमाला क्लब अध्यक्ष रोटेरियन योगेश कल्हापुरे, क्लब फर्स्ट लेडी योगिता कल्हापुरे, प्रकल्प प्रमुख डॉ. अवधूत शेटे, महेश टिबे, नीता टिबे, अपूर्वा शेटे, संजय माचवे, सुनील शर्मा, व्हिनस जॉय, सहसचिव मंदार पाठक आदी रोटेरियन सदस्य उपस्थित होते. गोशाळा ट्रस्टचे परागबुवा रामदासी यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा दिला. या वेळी नमूद केले, की क्लबने दोन वर्षांपूर्वी दिलेली रुग्णवाहिका आजही परिसरातील नागरिकांसाठी उपयुक्त ठरत आहे. आठ किमी परिसरात शासकीय आरोग्यसेवा उपलब्ध नसल्याने हे केंद्र सुमारे १० ते १२ हजार नागरिकांना आरोग्यसेवा पुरवणार आहे. 'सेवा परमो धर्मः' या तत्त्वावर काम करणारे अध्यक्ष योगेश कल्हापुरे यांनी या प्रकल्पाला प्राधान्य दिले. डी. जी. दिनेश मेहता यांनी रोटरीच्या वैद्यकीय व्यावसायिकांकडून नियमित सेवा देण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमात ईशा नेत्रालयाच्या सहकार्याने नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. सत्कर्म बालकाश्रमातील मुलांना छत्र्यांचे वाटप केले. या वेळी प्रमोद राजकारणे उपस्थित होते. डॉ. अनंत इटकर व डॉ. अवधूत शेटे यांनी आवश्यक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून दिली.

# कामगारांवर अन्याय होईल अशी प्रशासनाने कृती करू नये – शेरसिंग डागोर

## राज्य सफाई कर्मचारी आयोगाने घेतला भिवंडी मनपातील सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांचा आढावा

पालिकेत सेवा जेष्ठता डावलून कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जात आहे.तसेच बेकायदेशीरपणे वारंवार कामगारांच्या बदल्या केल्या जात आहेत.कामगार कर्मचाऱ्यांना पालिका प्रशासनाकडून सुविधा मिळत नाही तसेच कोंबडपाडा येथील मनपाची कामगार रहिवासी इमारत प्रशासनाकडून पाडण्यात आली आहे.त्यामुळे कर्मचाऱ्यांना निवासस्थाने देण्यात यावी अशी मागणी यावेळी भारतीय कामगार कर्मचारी महासंघाचे सचिव श्रीपत तांबे यांनी केली आहे.तसेच कामगारांवर होणारा अन्याय दुर करावा व सेवाज्येष्ठता नुसार नियुक्ती करण्यात यावी याबाबत युनियनचे अध्यक्ष भानुदास भसाळे यांनी लेखी तक्रारी महापालिका प्रशासनाकडे केल्याचे त्यांनी सांगितले.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( प्रतिनिधी )**

महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे राज्य मंत्री अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी नुकतीच भिवंडी महानगर पालिकेस भेट देऊन बैठक आयोजित केली होती.या बैठकीत सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांचा आढावा घेत त्यांच्या समस्या जाणून घेत तातडीने आयुक्तांनी लक्ष घालून कामगारांना न्याय दयावा अशी सुचना त्यांनी दिली.



महापालिका सभागृहात आयोजित बैठकीस पालिका आयुक्त अनमोल सागर,अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके,उपायुक्त विक्रम दराडे, सहाय्यक आयुक्त शैलेश दोंदे,शहर अभियंता जमिल पटेल,सहाय्यक आयुक्त अजित महाडीक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. संदिप गाडेकर,


तसेच मनपातील विविध कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी श्रीपत तांबे,भानुदास भसाळे, गौतम शेलार, विकास निकम, राजेश जाधव, रवी गायकवाड, राजू चव्हाण यांच्यासह अन्य मनपा अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

भिवंडी महापालिका सफ़ाई कर्मचा-यांना सेवा सुविधा द्याव्यात तसेच त्यांच्या पदोन्नती बाबत सुचना देत सलग २५ वर्षे सेवा केलेल्या सफाई कर्मचाऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत मोफ़त घर देण्यात यावे. जे कर्मचारी शासकीय वसाहतीत मागील ३५ वर्षापासून पिढ्यान पिढ्या एकाच घरात वास्तव्य करतात त्यांचे नावे पट्टा करावा अशा सूचना अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी यावेळी महापालिकाआयुक्त प्रशासनाला केल्या.त्यासोबत सफाई कर्मचाऱ्यांना हातमोजे, तोंडावर मास्क,रेनकोट व इतर सुविधा पालिकेने उपलब्ध करून देण्यात याव्यात व कामगारांची वेळोवेळी वैद्यकीय तपासणी करून घ्यावी व कामगारांवर अन्याय होईल अशी कृती प्रशासनाने करू नये अशी महत्त्वाची सूचना त्यांनी आयुक्तांना केली. यावेळी आयुक्त अनमोल सागर यांनी महापालिके कडून आरोग्य कर्मचा-यांना देण्यात येणा-या सेवा व योजनांचे सादरीकरण केले.यावेळी महाराष्ट्र राज्य सफ़ाई कर्मचारी आयोगा चे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी पालिकेने केलेले सादरीकरण पाहुन समाधान व्यक्त केले.

# कल्याण तालुक्यात जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** नवीन शैक्षणिक वर्ष२०२५-२६चे औचित्य साधून जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात, पांरपारीक पध्दतीने व ग्रामस्थांच्या सहभागातून साजरा करण्यात आला. परंतु देशाचा भावी नागरिक म्हणून घडविणा-या शाळांची अवस्था काय?तर गळके टेरेस, वरपासून ते खालपर्यंत भिजलेल्या भिंती, फुटलेले पत्रे, छताचे कोसळलेले प्लास्टर, गंजलेल्या खिडक्या, दरवाजे, उखडलेल्या लाद्या, शाळेमध्ये उगवलेली झाडे झुडपे, गवत, त्यामध्ये ठेवलेला लाकूडफाटा, पेंडा,



## तालुक्यातील १३२ पैकी शंभरहून अधिक वर्गखोल्या नादुरुस्त

शौचालयाच्या फुटलेल्या, तुटलेल्या पाइपा,अशी भयानक, विदारक परिस्थिती कल्याण तालुक्यात दिसून येत असेल तर मुरबाड, शहापूर ची काय असेल?याचा विचार न कलेला बरा!

कल्याण तालुक्यातील म्हारळ, गोवेली, खडवली, मामणोली, गुरवली, खोणी, दहिसर, आणि सोनारपाडा या ७केंद्रा अंतर्गत एकूण१३२वर्गखोल्या आहेत, यामध्ये बावीशे ते तेवीशे पर्यंत विद्यार्थी पटसंख्या आहे, यातील सुमारे१००च्या वर्गखोल्या नादुरुस्त आहेत, यामध्ये गुरवली केंद्रात असलेल्या निंबवली जिप शाळांची अवस्था खूपच विदारक, भयावह, भयानक आहे, विशेष म्हणजे येथील २/३वर्षापूर्वी बांधलेल्या स्लॅंपच्या शाळेत 'ठिबकसिंचन, सुरू झाले आहे, छताचे प्लस्टर कोसळलेले दिसत आहे, भिंती खालपर्यंत ओल्या झाल्या आहेत, दुसऱ्या शाळेच्या भिंती, समोरील भाग, तुटलेला, फुटलेला आहे, लाद्या उखडलेल्या आहेत, शौचालयाच्या पाईपा फुटलेल्या, तुटलेल्या दिसून येत आहेत,दरवाजे, खिडक्या, सडलेले, गंजलेल्या आहेत, समोरच्या शाळेत झाडे झुडपे, गवत वाढलेले आहे, यामध्ये लाकूडफाटा, ठेवलेला आहे, एकूणच दिसणारे दृश्य विदारक आहे,

काही अंशी अशी परिस्थिती चौरे, उशीद, कांबा, बेहरे, मांजर्ली, म्हसकळ, नडगाव, दहागाव, ठाकूरपाडा, राये, इत्यादी शाळांची दिसून येत आहे. हे फक्त कल्याण तालुक्यात आहे असे अजिबात नाही तर, शहापूर, मुरबाड, भिंवडी, हे तालुके देखील मागे नाहीत, दरवर्षी पावसाळ्यात आवश्यक मोठ्या दुरुस्ती ची यादी तयार केली जाते, त्यावर लाखोंचा खर्च केला जातो, हे कशासाठी व कोणासाठी?गुरवली येथे तर चक्क कौलारू छतावर स्लॅंप टाकला आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळणाऱ्या आणि निकृष्ट दर्जाचे काम करुन शासनाचे लाखो रुपये लाटणा-या ठेकेदार व त्यांना सहकार्य करणाऱ्या शिक्षक व इतर अधिकारी यांच्या वर गुन्हे दाखल करावे अशी मागणी धर्मवीर चॅरेटेबल ट्रस्ट चे कल्याण तालुका अध्यक्ष किरण केणे यांनी केली आहे.



# पेण पंचायत समिती गटविकास अधिकारी पदावर गजानन लेंडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :: प्रतिनिधी**

पेण पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी म्हणून गजानन मधुकर लेंडी यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार नुकताच स्वीकारला आहे. प्रशासकीय सेवेत जवळपास ३० वर्षांचा अनुभव असलेले लेंडी हे अत्यंत कार्यकुशल, अनुभवी आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जातात.

गजानन लेंडी यांनी १९९५ साली जिल्हा परिषद रायगडच्या शिक्षण विभागात आपल्या सेवेला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात त्यांनी शिक्षण विभागामध्ये जबाबदारी सांभाळत जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभाग, सामान्य प्रशासन विभाग अशा विविध शाखांमध्ये उल्लेखनीय कार्य केले. त्यानंतर ते पंचायत समिती श्रीवर्धन येथे बदली होऊन गेले, जिथे त्यांनी स्थानिक ग्रामीण विकासाच्या दृष्टीने महत्वाची कामगिरी पार पाडली. त्यानंतर त्यांची बदली त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक येथील पंचायत समितीत गटविकास अधिकारी म्हणून झाली होती. तेथेही त्यांनी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत गावांच्या प्रगतीस हातभार लावला.

आता पुन्हा एकदा पेण पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी म्हणून रुजू होत त्यांनी या भागातील ग्रामीण विकासासाठी नव्या जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे स्थानिक प्रशासनाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास ग्रामस्थ आणि सहकारी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

पेण तालुक्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून ही नियुक्ती अत्यंत महत्वाची मानली जात असून, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि पाणीपुरवठा यासारख्या प्रमुख योजनांमध्ये गती येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आमदार निरंजन डावखरे यांच्या निधीतून शैक्षणिक विकासाला चालना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २९ :** ठाणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या ठाणे येथील धर्मवीर आनंद दिघे उपकेंद्राचा दर्जा आता आणखी सुधारणार आहे. आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या आमदार निधीतून या उपकेंद्रात नवीन संगणक, वर्गामध्ये साउंड सिस्टिम लावण्यात आले आहे. याशिवाय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी उपकेंद्राच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरेही बसवण्यात आले आहेत. या उपकेंद्रामध्ये सोयीसुविधांचा अभाव होता. याची दखल घेत आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी येथे सुविधा उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. या कार्यक्रमाला निरंजन डावखरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. सोबत प्र कुलगुरू डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

मुंबई विद्यापीठाच्या मागे आपण सर्व भक्कमपणे उभे आहोत. ही साथ आणि सहकार्य कायम राहिल्यास मुंबई विद्यापीठही जागतिक स्पर्धेत सातत्याने अग्रस्थानी राहील, असा विश्वास आणि अपेक्षा या वेळी ॲड. निरंजन डावखरे यांनी व्यक्त केला. विद्यापीठ परिसराकडे जाणाऱ्या रस्त्याची स्थिती सुधारण्यासाठीसुद्धा आपण वचनबद्ध आहोत, असे आश्वासित केले. एका विनंतीवर निधी मंजूर कोणतीही अधिकृत लेखी मागणी किंवा वारंवार पाठपुरावा न करता, फक्त तोंडी विनंतीनंतर आमदार निरंजन डावखरे यांनी एका महिन्यात हा निधी मंजूर करून वितरित केला. त्यांच्या या योगदानामुळे ठाणे परिसरातील शैक्षणिक विकासाला अधिक चालना मिळेल आणि विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण घेण्यास मदत होईल, असा विश्वास मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी या वेळी व्यक्त केला. या निधीतून ३० संगणक व त्यासोबत प्रिंटर, १५ वर्गासाठी अत्याधुनिक साउंड सिस्टिम व २ टेलीव्हिजन संच, तसेच संपूर्ण परिसराच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही प्रणाली यासारख्या आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



# शाळाबाह्य विद्यार्थ्यांना प्रवाहात आणण्यासाठी ठाणे मनपाने कसली कंबर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**:: अर्जुन चेमटे**

**ठाणे :** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम 2009 या कायद्यानुसार वय वर्ष 06 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे शिक्षण व दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शाळेत प्रवेश न घेतलेले व ज्या बालकांनी शाळेत प्रवेश घेऊन प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले नसेल अशा 06 ते 14 वयोगटातील एका महिन्यापेक्षा अधिक काळ सातत्याने अनुपस्थित राहत असतील अशा शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, बालकांचे पालकासोबत होणारे स्थलांतर थांबवणे, स्थलांतरित बालकांना त्याच परिसरात शिक्षणाचे प्रवाहात कायम ठेवणे व स्थलांतरित होणाऱ्या बालकांना शिक्षण हमीकार्ड देऊन त्यांचे शिक्षण अबाधित राखण्यासाठी दि.01 जुलै ते 15 जुलै 2025 या कालावधीत महानगरपालिका व खाजगी अनुदान शाळेच्या वतीने सर्व्हेक्षण मोहिम राबविण्यात येणार आहे. असे ठाणे महानगरपालिका शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी सांगितले आहे.

> **शाळाबाह्य अथवा स्थलांतरित बालकांच्या पालकांनीही व त्यांच्या आस्थापना अधिकाऱ्यांनी, उद्योजक, अथवा मालकांनी अशा मुलांना नजीकच्या शाळेत दाखल करण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे. अशा बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व टिकवून ठेवण्यासाठी शिक्षण विभाग कटिबद्ध आहे, त्यासाठी समाजातील सर्व घटकांनी सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.**
>
> ■ कमलाकांत म्हेत्रे - शिक्षणाधिकारी , ठाणे महानगरपालिका ठाणे

राज्यातील बऱ्याच जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात कुटुंबे विविध व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतर करीत असतात. सदर कुटुंबे आर्थिक स्तर निम्न असलेल्या वंचित घटकातील, भूमीहीन अथवा अल्पभूधारक असतात. या स्थलांतरणांमुळे मुलांच्या प्राथमिक, माध्यमिक शिक्षणात खंड पडण्याची समस्या निर्माण होणे. त्यातही मुलींचे प्रमाण वाढण्याची भीती जास्त आहे. ऊस तोडणीसाठी ही कुटुंबे पश्चिम महाराष्ट्रात तर शेजारी असणाऱ्या कर्नाटक व गुजरात राज्यात स्थलांतर करतात. तसेच वीजभट्टी, दगडखान मजूर, कोळसाखानी, शेतमजूर, बांधकाम व्यवसाय, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कामे, रस्ते, नाले, जिनिंग मिल इत्यादी प्रकारच्या कामानिमित्त विविध कामगार स्थलांतर करीत असतात. त्याचबरोबर दिव्यांग बालकांची आव्हाने देखील अधिक वाढत आहेत. त्यामुळे बालकांचा देखील विचार होणे आवश्यक आहे.

यासाठी शालेय परिसरात घरोघरी जाऊन, बस स्थानक, सिग्नल खानावळी, रेल्वे स्थानक, सार्वजनिक ठिकाणी, बाजारपेठ, विटभट्या, दगड खाणी, छोटे छोटे कारखाने या ठिकाणी बालमजूर असण्याची शक्यता असते. तसेच लहान मोठ्या वस्त्या, वाडी, तांडे, पाडे, शेतमळे व जंगलात वास्तव्य करणारे पालक अशा सर्व ठिकाणी सर्वेक्षण केले जाणारा असून सर्वेक्षणात आढळलेल्या शाळाबाह्य व स्थलांतरित बालकांना नजीकच्या शाळेत त्याच्या वयानुसार वर्गात दाखल करून घेतले जाणार आहे.सर्व महानगरपालिका व खाजगी अनुदानित शाळांनी सर्वेक्षण करून त्याचा दैनंदिन अहवाल गटप्रमुखांमार्फत महापालिकेस सादर करण्याचे निर्देश ठाणे महापालिका शिक्षण अधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी दिले आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T. | B.Sc. CHEMISTRY MATHS | B.A.F. | BAMMC | B.Com. | B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT | M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

"ठाणे जीवनदीप वार्ता" हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI No. MAH/MAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com